Vol 3 Issue 8 Sept 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-8, Sept-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# ज्ञानोबा उत्पातांच्या लावणीचे स्वरूप

**महादेव देशमुख**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख संगमेश्वर कॉलेज सोलापूर

***सारांश* :**लावणी ही 'रसिकाश्रयी' लोककला आहे. त्यामुळे लावणी फक्त वाचनीय असून चालत तर ती श्रवणीय असावी लागते आणि मुख्य म्हणजे प्रेक्षणीय असावी लागते. दृश्य, श्राव्य आणि नृत्य लावणीची तीन प्रधान अंगे आहेत. कोणतीही लावणी जेव्हा समोर बसलेल्या प्रेक्षकांच्या काळजाला हात घालते तेव्हाच ती खऱ्या अर्थाने यशस्वी ठरते. त्यासाठी लावणीकाराला शब्दांबरोबरच सादरीकरणाचे भान, लोकमानसाची जाण आणि संगीताची उत्तम बैठक असणे आवश्यक ठरते. मराठी लावणीच्या परंपरेत पठ्ठे बापूराव, राम जोशी, अनंत फंदी, होनाजी, परशराम, प्रभाकर, सगनभाऊ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, ग.दी. माडगूळकर, संजीव, वसंत बापट, जगदीश खेबूडकर, शांता शेळके, ना. धों. महानोर, राम उगावकर, आणि ज्ञानोबा उत्पात अशी मोजकीच नावे सांगता येतात.

***प्रस्तावना :***

ज्ञानोबा उत्पातानंतर आज तरी या महाराष्ट्रात वरील परंपरेत बसू शकणारा लावणीकार सापडत नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते. ज्ञानोबा उत्पातांच्या लावणीला स्वातंत्र्योंत्तर लावणी वाङ्‌मयात अतिशय महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर लावणीकारांपैकी बहुतांश लावणीकारांनी (माडगूळकर, खेबूडकर, शांता शेळक, महानोर इत्यादी) प्रामुख्याने चित्रपटांसाठी लावणीलेखन केलेले आढळते. उत्पातांनी मात्र तमाशा आणि लावणीच्या फडांसाठी लेखन केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या लावण्यांमध्ये ग्राम्यता, शृंगारिकता, खेड्यापाड्यांतील बहुजनसमाजांतील लोकांच्या जीवनविशेषांचे चित्रण इत्यादी वैशिष्ट्ये आढळतात. ग्रामीण भागातील माणसाच्या मनातील पकड घेणारी विषयनिवड, भुरळ पाडणारी भाषाशैली आणि अंगभुत गेयतेमुळे उत्पातांची लावणी विलक्षण पृथगात्म वाटते.

उत्पातांचा 'घुंगुरचाळा' हा लावणीसंग्रह प्रसिद्ध आहे. पारंपरिक लावण्यांचे एक संपादित पुस्तकही त्यांच्या नावावर आहे. महाराष्ट्रातील तमाम लावण्यांच्या पार्ट्यांमध्ये आणि लावणी रसिकांमध्ये उत्पातांची लावणी अतिशय लोकप्रिय असल्याचे निदर्शनास येते. त्यांच्या लावण्यांमध्ये विषयवैविध्य आहे. एक खट्याळ आणि रंगेल ग्रामीण स्त्री ही उत्पातांच्या लावणीची नायिका असल्याचे दिसते. प्रियकराची आतुरतेने वाट पाहणारी, त्याच्या विरहात व्याकुळलेली घरी आलेल्या सख्याला रात्री मुक्काम करण्याची विनवणी करणारी, मला नावंत बसवा असा लाडीक हट्ट करणारी, नागपंचमीला शृंगार करुन निघालेली, मनसोक्त रंगपंची खेळणारी, 'कालच्या ऱा़त्रीची सर नाही यायची' असे म्हणत त्या मधूर स्मृतीतच रमणारी, रायाने बुगडी दिली म्हणून कौतुकाने सांगणारी, वावडी उडविणाऱ्या सख्याचे वर्णन करणारी, पुरुषदेहावर भाळणारी, प्रियकरावर रुसलेली, तारुण्याच्या आगमनाने मोहरलेली, कधी संभोगोत्सुक तर कधी मासिक धर्माच्या काळात संभोग नको असे सख्याला धीटपणे पण लाडीक स्वरात सांगणारी, मातृत्वाने आनंदीत होणारी, पुरुषजातीच्या फसवणुकीच्या कहाण्या सांगणारी अशा विभिन्न आणि विपुल रुपांत ती आपल्याला भेटते. तिचे प्रत्येक रुप उत्पातांनी अतीव कुशलतेने आणि ठसकेबाजपणे खुलवलेले दिसते.

प्रियकराची आतुरतेने वाट पाहणाऱ्या नायिकेचे मनोगत व्यक्त करताना उत्पात लिहितात,

उभी राहूनी माडीवरती वाट पाहिली काल
वाटलं होतं तुम्ही याल राया वाटलं होतं तुम्ही याल।।धृ।।
तुमच्या आवडीचा शालू नेसले
चोळी किनखाबी लाल
तुमच्यासाठी तयार ठेवले
नरम गुलाबी गाल।।

अशा प्रकारची ऐकताक्षणी ठेका धरायला लावणारी रचना हे उत्पातांच्या लावणीचे वैशिष्ट्य आहे. प्रियकराने घेतलेल्या शालूचे कौतुक सांगताना त्यांची नायिका एका लावणीत म्हणते.

नको गं मालू नको गं नलू
घडली गोष्टी कुणा सांगायची नाही
रायानं घेतला शालू ही बात कुणाला बोलायची नाही।।

उत्पातांची प्रत्येक लावणी ही चाल घेऊन जन्माला येताना दिसते. लावणी ही पेटी आणि ढोलकीच्या सहाय्याने गायली जात असल्याने लावणीकाराला कोणतीही लावणी लिहिताना छंद आणि लयीचे भान जपावे लागते. ती गद्यामकतेकडे झुकणार नाही याची पुरेपर काळजी घ्यावी लागते. हे करत असताना समोर बसणाऱ्या सर्वसामान्य रसिकांची दाद मिळवणारी रचना करण्याचीही जबाबदारी त्याला पेलावी लागते. यातच खऱ्या लावणीकाराचे कसब पणाला लागताना दिसते. उत्पात यादृष्टीने कमालीचे यशस्वी ठरल्याचे दिसतात. त्यांची प्रत्येक लावणी खेडूत माणसाने फेटा उडवून दाद द्यावी असा विषय घेऊन साकारते. प्रियकराबरोबर व्यतीत केलेल्या कालच्या रात्रीचे वर्णन अत्यंत संयतपणे पण तितक्याच खटकेबाजपणे मांडताना त्यांची नायिका म्हणते–

सख्या सजणा नाही विसरायची
न् कालच्या गोष्टीची सर नाही यायची।।धृ।।
तुमच्या आमच्याइश्काचा काल घातला पाया
मी तुम्हांला अर्पण केली माझी काया
राहून राहून आठवण येते
सख्या तुमच्या घाईची
कालच्या रात्रीची सर नाही यायाची।।धृ।।

रुपकात्मतेचा सुरेख उपयोग उत्पातांच्या लावणीत आढळतो. अश्लिलतेच्या पेरणीने लावणी खुमासदार होते खरी, परंतु अश्लिलता ही उघड उघड नसावी. अश्लिलतेच्या अशा रोखठोक प्रकटीकरणामुळे लावणीला बीभत्सता प्राप्त होते आणि चांगल्या रसिकांचा रसभंग होतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील काही लावण्यांमध्ये हा प्रकार झाल्याचे निदर्शनास येते. यासाठी लावणीमध्ये अश्लिलता ही रुपकात्मक पद्धतीने यायला हवी. रुपकात्मतेमुळे लावणी वरवर अश्लिल वाटत नाही पण अश्लिलतेचे सूचन मात्र करत राहते आणि मनोमन खूश होतात. ग.दि. माडगूळकर, जगदिश खेबूडकर, संजीव यांच्या काही लावण्यांमध्ये अशा प्रकारची रुपकात्मक मांडणी आढळते. पण उत्पातांच्या रुपकात्मक लावणीची तऱ्हा काही औरच असल्याचे जाणवते. एका लावणीत त्यांची नायिका प्रियकाराला म्हणतेः

नुसतं हसून राया भागायचं नाही
राया मी तुमच्याशी बोलायची नाही।।धृ।।
लई दिसानी आज उगवला
आनंद झाला माझ्या मनाला
जेवल्यावाचून आज सोडायची नाही।।

एक स्त्री आपल्या प्रियकराला जेवणाचा आग्रह करते आहे हा यातून प्रतीत होणारा पृष्ठस्तरीय आशय. पण तो नकळतपणे शरीरसंबंधाच्या मागणीचे सूचना करत राहतो. नायिका पुढे म्हणतेः

भोजनाची झाली तयारी
भात मसाला आणि कचोरी
लाडूची जोडी आज फोडायची हाय हो।।

'लाडूची जोडी' हा शब्दप्रयोग अप्रत्यक्षपणे नायिकेच्या वक्षस्थळांचे सूचन करतो आणि रसिकांना हवा तो आनंद प्राप्त होतो. अशी द्विअर्थी शब्दरचना हेच रुपकात्मक लावणीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. उत्पातांच्या एका लावणीत नायिका घरी आलेल्या सख्याला थांबण्याची विनवणी करते. त्याने आजची रात्र इथेच रहावे आणि आपला यथेच्छ उपयोग घ्यावा ही मनातील छुपी आस रुपकात्मक पद्धतीने मांडताना ती म्हणतेः

अहो पावणं जरा थांबा
हितं पाडाला पिकलाय आंबा
आजच्या दिस हितं ऱ्हावा
उद्या सकाळी गावाला जावा।।

पुरुषजातीकडून होणाऱ्या सततच अवहेलनेमुळे तिच्या मनातील ही इच्छा अपूर्णच राहते आणि मग एका लावणीत ती म्हणतेः

अहो पावणं जरा थांबा
हितं पाडाला पिकलाय आंबा
आजच्या दिस हितं ऱ्हावा
उद्या सकाळी गावाला जावा।।

पुरुषजातीकडून होणाऱ्या सततच्या अवहेलनेमुळे तिच्या मनातील ही इच्छा अपूर्णच राहते आणि मग एका लावणीत ती म्हणतेः

गाणे पेटीमध्ये तसेच राहिले
घुमला नाही ताल
नही कदरदान म्हणून राया
पडून राहिला माल।।

अशा प्रकारची प्रतीकात्मक मांडणी उत्पातांच्या लावण्यांमध्ये अनेक ठिकाणी आढळते. त्यामुळे त्यांची लावणी बीभत्सतेकडे झुकत नाही. ती शालीन वाटते.

जिवंत ग्रामीण प्रतिमासृष्टी हा उत्पातांच्या लावणीचा एक महत्त्वाचा विशेष जाणवतो. गावगाडा, ग्रामीण भागातील खेळ, कृषिजीवन, ग्रामीण स्त्रियांचे अलंकार, पुरुषांचा रांगडा स्वभाव असे अनेक संदर्भ त्यांच्या लावण्यांमध्ये येताना दिसतात. त्यामुळे खेड्यापाड्यातील अशिक्षित माणसालाही त्यांची लावणी आपली वाटते. एका लावणीत त्यांची नायिका म्हणतेः

मोट माझ्या रायानं धरली
तिला खिलारी जोडी चाक मोटंचं
त्याच्या नादावर खेळायचं हाय
मला थारोळ्यात न्हायाला बसायचं हाय।।

मोट, खिलारी जोडी यांसारख्या कृषिजीवनाशी संबंधित प्रतिमांमुळे त्यांची लावणी अस्सल ग्रामीण वाटते. एका लावणीत त्यांची नायिका प्रियकराला खेळ खेळण्याचे आवाहन करताना अनेक ग्रामीण खेळांचे उल्लेख करतेः

खेळ खेळू गोट्याचा
नहीतर आट्यापाट्याचा
आडवून धरते कोंड राया नका धरु हो राग।।

खेडूत स्त्रियांच्या अलंकारांचे वर्णनही एका लावणीत आढळते.

म्हणे घेतो तुला ठुशी मोरणी
कशी करावी साखरपेरणी
नको करुस रे मनधरणी
अशा नाटकाला बाई मी भुलायची नाही।।

ग्रामीण भागातील स्त्रियांना पर्यटनाचं आणि हॉटेलचे असणारे आकर्षणही काही लावण्यांमधून आविष्कृत झालेले आढळते. एका लावणीत नायिका म्हणतेः

कांदा भजीची चवच न्यारी
मसाला डोसा आवडे भारी
दूध कोल्ड्रिंग कवा प्यायचं
हॉटेलात कवा न्यायचं?।।

तर एका लावणीत नायिका सख्याजवळ नावंत बसण्याची इच्छा प्रकट करतेः

पुनवच्या रातीला चांदाच्या साथीला
एक हौस माझी पुरवा
मला नावंत बसवा।।

कोल्हापूर, जेजूरी, पंढरपूर, यांसारख्या तीर्थक्षेत्रांची वर्णनही काही लावण्यांमधून आलेली दिसतात.

हेवा वाटावा अशी साधी पण अत्यंत प्रभावी शब्दकळा हा उत्पातांच्या लावणीचा महत्त्वाचा विशेष मानावा लागेल. उत्पातांच्या लावणीला संस्कृतप्रचूर शब्दांचा फारसा सोस असल्याचे जाणवत नाही. वृतछंदाच्या अधिक आहारी जाणेही तिने टाळलेले दिसते. त्यामुळे त्यांची लावणी पठ्ठे बापूराव किंवा राम जोशी यांच्यासारखी घेटीव वाटत नाही. तिचा पोत अधिक मोकळा आणि सुगम्य वाटत राहतो. दौलत, इश्य, सगाई यांसारखे हिंदी–उर्दू शब्द अत्यंत चपखलपणे आणि सफाईतदारपणे त्यांनी वापरलेले आढळतात. उत्पातांची संगीताची जाण उत्तम असल्याने त्यांच्या लावणीला एक स्वभावगत लय आणि ताल जाणवतो. नोकरीच्या निमित्ताने मोडनिंबसारख्या ग्रामीण भागात त्यांनी आयुश्याचा बराच काळ व्यतीत केल्यामुळे ग्रामीण लोकजीवन त्यांनी जवळून अनुभवले होते. त्यामुळेच लोकमानसाचे अत्यंत जिवंत आणि खटकेबाज चित्रण त्यांच्या लावणीमध्ये आढळते. या सर्व वैशिट्यांमुळे एकूणच मराठी लावणीच्या परंपरेत उत्पातांच्या लावणीने एक मानाचे स्थान मिळविले आहे. .

***संदर्भ ग्रंथः–***

1.मराठी लावणी वाङमय – गंगाधर मोरजे
2.मराठी लावणीचा उशःकाल – म. ना सहस्त्रबुध्दे
3.मऱ्हाटी लावणी – म. वा. धोंड
4.पैंजण– वसंत जोशी
5.मराठी लावणी विजय आहेर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium    Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net